ePaper


# माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी वयाच्या 92व्या वर्षी एम्स रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास!

वर्ष - 8 । अंक -168 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 27 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- ऑस्ट्रेलियाचे भारतावर वर्चस्व!
- बॉक्सिंग डे कसोटीत खलिस्तान्यांचा राडा
- डॉ. मनमोहन सिंग यांचं निधन
- डाबर आणि पतंजली भिडले!

# दिग्गज अर्थऋषी हरपला !

## संकटात असलेल्या अर्थव्यवस्थेला उभारी देणारे डॉ. मनमोहन सिंह यांचे निधन



- देशभरातून हळहळ व्यक्त
- दिल्लीच्या एम्स रुग्णालयात अखेरचा श्वास
- सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा, बेळगावची काँग्रेसच्या कार्यकारिणीची सभा रद्द

**। पुणे । विशेष प्रतिनिधी । महाईन्यूज**

भारताचे दिग्गज माजी पंतप्रधान, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांचं आज (२६ डिसेंबर) निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दिल्लीच्या एम्स रुग्णालयाने दिलेल्या माहितीनुसार, प्रकृती अस्वास्थामुळे रात्री 8 च्या सुमारास त्यांना नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतर त्यांना आपत्कालीन कक्षात दाखल करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमकडून त्यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र रात्री 9.51 वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाचे वृत्त कळताच संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे.

## संपूर्ण भारतावर दु:खाचा डोंगर

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक स्तरावरुन श्रद्धांजली वाहण्यात येत आहे

अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांना श्वसनास त्रास होत होता. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. यावेळी एम्स रुग्णालयात दिग्गज डॉक्टरांच्या टीमने त्यांच्यावर उपचार केले. यावेळी मनमोहन सिंह यांच्या फुफ्फुसांमध्ये इन्फेक्शन झाल्याची माहिती समोर आली. डॉक्टरांनी लगेच मनमोहन सिंह यांच्यावर उपचार सुरु केले. त्यांना ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आलं. पण त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती तेव्हाच समोर आली होती. यानंतर काँग्रेसच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी आणि खासदार प्रियंका गांधी या एम्स रुग्णालयात दाखल झाल्याची माहिती समोर आली. यानंतर आता मनमोहन सिंह यांचं निधन झाल्याची दुर्देवी बातमी समोर आली आहे. भारताचे दिग्गज माजी पंतप्रधान, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांचं निधन झालं आहे. मनमोहन सिंह यांनी वयाच्या 92 व्या अखेरचा श्वास घेतला. त्यांची आज अचानक प्रकृती बिघडल्याने दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण उपचारादरम्यान त्यांचं निधन झालं. मनमोहन सिंह यांचा जन्म 26 सप्टेंबर 1932 रोजी पंजाबच्या गाह (सध्याच्या पाकिस्तानातील

## असा अर्थमंत्री पुन्हा होणे नाही, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचा अल्पपरिचय

मनमोहन सिंह यांनी 1991 मध्ये केंद्रीय अर्थमंत्री असताना उदारीकरणाचा घेतला निर्णय ऐतिहासिक ठरला. त्यांच्या या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला एका वेगळ्या उंचीवर नेलं. मनमोहन सिंह यांच्या उदारीकरणाच्या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकट केलं.

मनमोहन सिंह यांनी देशाला यशाच्या एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं. मनमोहन सिंह यांनी 1991 मध्ये केंद्रीय अर्थमंत्री असताना उदारीकरणाचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक ठरला. त्यांच्या या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्था एका वेगळ्या उंचीवर गेली. मनमोहन सिंह यांच्या उदारीकरणाच्या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकट केलं.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वळणाचे जनक म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांना ओळखले जाते. डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताचे 14 वे पंतप्रधान होते. डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत आणि अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रती असलेला शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता आणि विनम्र आचरणामुळे ते कायमच चर्चेत असायचे.

पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा जन्म 26 सप्टेंबर 1932 रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. डॉ. मनमोहन सिंग यांनी 1948 साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर 1957 साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. यानंतर 1962 साली डॉ. मनमोहन सिंग यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी फील संपादन केली.

“ एक सन्माननीय अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. मनमोहन सिंह यांना ओळखले जात. विविध सरकारी पदांवर त्यांनी उत्तमरित्या काम केले. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवला. संसदेतील त्यांचा हस्तक्षेपही अभ्यासपूर्ण असायचा. विशेष म्हणजे पंतप्रधान म्हणून त्यांची लोकांचे जीवन सुधारण्यासाठी अथक प्रयत्न केले.

**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

“ डॉ. मनमोहन सिंग यांनी अफाट बुद्धी आणि सचोटीच्या जोरावर भारताचे नेतृत्व केले. त्यांची अर्थशास्त्राबद्दल असलेली सखोल जाण यातून राष्ट्राला प्रेरणा मिळाली. श्रीमती कौर आणि त्यांच्या कुटुंबियांप्रती माझ्या संवेदना व्यक्त करतो. मी एक गुरु आणि उत्तम मार्गदर्शक गमावला, असे ट्वीट काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले.

**-राहुल गांधी,**

“ माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांच्या निधनाने आपण एक महान अभ्यासक, अर्थतज्ज्ञ आणि राजकारणी गमावला. त्यांनी १० वर्षे पंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली. भारतीय आर्थिक सुधारणांमध्ये त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली.त्यांचे कुटुंबीय, मित्र आणि चाहत्यांच्या मनःपूर्वक संवेदना, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

# भाजपचे 5 जानेवारीला ‘घर चलो’!

## भाजपचे प्रत्येक बूथवर 200 सदस्यनोंदणीचे उद्दिष्ट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी महापालिका निवडणुकीची तयारी सुरू केलेल्या भारतीय जनता पक्षाने शहरातील प्रत्येक बूथवर २०० सदस्यनोंदणीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. तसेच येत्या पाच जानेवारी रोजी ‘घर चलो’ अभियानही राबविले जाणार आहे.**



विधानसभा निवडणुकीत महायुतीला आणि पक्ष म्हणून भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्यानंतरही या यशामध्ये फार रममाण न राहता भाजपने आता महापालिका निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले आहे. शहरातील आठही विधानसभा मतदारसंघात भाजपने सदस्यनोंदणी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे. या पार्श्वभूमीवर भाजप पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा मंगळवारी झाली. त्या वेळी प्रत्येक बूथवर २०० सदस्य नोंदणी करण्याचे निश्चित करण्यात आले. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, शहराध्यक्ष धीरज घाटे, सरचिटणीस पुनीत जोशी, रवींद्र साळेगांवकर, राघवेंद्र मानकर, प्रमोद कोंढरे, महेश पुंडे, राजेंद्र शिळीमकर या वेळी उपस्थित होते. शहर सदस्यता अभियानप्रमुख राघवेंद्र मानकर यांनी प्रत्येक बूथवर २०० सदस्य नोंदणी करण्याचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांसमोर ठेवले. तसेच, ५ जानेवारी रोजी ‘घर चलो’ अभियान राबविण्यात येणार असून, नागरिकांना सदस्य करून घेण्याची सूचना त्यांनी केली. पीयूष कश्यप यांनी सदस्यता नोंदणीसंदर्भात सर्व तांत्रिक गोष्टींची माहिती कार्यकर्त्यांना दिली. सदस्य नोंदणीसाठी ८८००००२०२४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही कश्यप यांनी केले. शहरातील सदस्य नोंदणीची संख्या राज्यात सर्वाधिक पाहिजे, असे आवाहन प्रभारी जगदीश मुळीक यांनी केले. दर सहा वर्षांनी सदस्यता अभियान होते. निवडणूक असलेली राज्ये सोडून इतर ठिकाणी ९ कोटी सदस्य झाले आहेत. लोकशाही पद्धतीने संघटनेच्या निवडणुका होतात. पुणे शहरात विधानसभेला पडलेल्या मतांपेक्षा जास्त नोंदणी झाली पाहिजे, अशी सूचना या वेळी चंद्रकांत पाटील यांनी केली. सक्रिय सदस्य होण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने कमीत कमी ५० सदस्य नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच, प्रत्येक विधानसभा क्षेत्रातून ८० हजार ते एक लक्ष नोंदणी झाली पाहिजे, असेही आवाहन महाडिक यांनी केले.शहरात कार्यकर्त्यांची मोठी साखळी असून, १० असे १० हजार कार्यकर्ते यात सहभागी होतील, असे शहराध्यक्ष घाटे यांनी सांगितले.विधानसभा निवडणुकीत महायुतीला आणि पक्ष म्हणून भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्यानंतरही या यशामध्ये फार रममाण न राहता भाजपने आता महापालिका निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले आहे. शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांत भाजपने सदस्यनोंदणी मोहीम राबविण्याचे निश्चित केले आहे. या पार्श्वभूमीवर भाजप पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा मंगळवारी झाली. शिळीमकर या वेळी उपस्थित होते.शहर सदस्यता अभियानप्रमुख राघवेंद्र मानकर यांनी प्रत्येक बूथवर २०० सदस्य नोंदणी करण्याचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांसमोर ठेवले. तसेच, ५ जानेवारी रोजी ‘घर चलो’ अभियान राबविण्यात येणार असून, नागरिकांना सदस्य करून घेण्याची सूचना त्यांनी केली.

### 50 सदस्य नोंदणी करणे आवश्यक

पीयूष कश्यप यांनी सदस्यता नोंदणीसंदर्भात सर्व तांत्रिक गोष्टींची माहिती कार्यकर्त्यांना दिली. सदस्य नोंदणीसाठी ८८००००२०२४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही कश्यप यांनी केले.शहरातील सदस्य नोंदणीची संख्या राज्यात सर्वाधिक पाहिजे, असे आवाहन प्रभारी जगदीश मुळीक यांनी केले. दर सहा वर्षांनी सदस्यता अभियान होते. निवडणूक असलेली राज्ये सोडून इतर ठिकाणी ९ कोटी सदस्य झाले आहेत. लोकशाही पद्धतीने संघटनेच्या निवडणुका होतात. पुणे शहरात विधानसभेला पडलेल्या मतांपेक्षा जास्त नोंदणी झाली पाहिजे, अशी सूचना या वेळी चंद्रकांत पाटील यांनी केली. सक्रिय सदस्य होण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने कमीत कमी ५० सदस्य नोंदणी करणे आवश्यक आहे.

# चार वेळा निवडून आले, ईव्हीएमवर संशय कसा घेऊ?

## सुळे यांनी केला बारामती तालुक्यातील गावांचा दौरा

।पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी।

**‘मी चार वेळा ‘ईव्हीएम’वर निवडून आले. त्यामुळे ईव्हीएममध्ये घोटाळा आहे, असे मी कसे म्हणू,’ असे विधान खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी बारामती येथे केले. अनेक ठिकाणी लोकांचे म्हणणे आहे की, त्यांची मते दुसरीकडे गेली आहेत**



त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हे विधान केले.‘बारामती विधानसभा निवडणूक लढविलेले राष्ट्रवादीचे उमेदवार युगेंद्र पवार यांना मतपडताळणी करू नका, असे मी सांगितले होते. ते एकाच उमेदवाराबाबत होते. खडकवासल्याचे उमेदवार सचिन दोडके यांच्याशीही मी चर्चा केली होती. मी स्वत: चारवेळा ईव्हीएमवर निवडून आले आहे. त्यामुळे त्यात घोटाळा आहे, असे मी कसे म्हणू शकेन,’ असे सुळे यांनी सांगितले. दरम्यान, बारामती विधानसभा मतदारसंघात पराभव झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मिळालेल्या मतांवर आक्षेप घेऊन राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी मतमोजणी पडताळणीसाठी केलेला अर्ज मागे घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर संशय घेतला जात असताना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी पराभूत उमेदवारांची दिल्ली येथे गेल्या आठवड्यात बैठक घेतली होती. मात्र, त्यानंतर युगेंद्र पवार यांनी अर्ज मागे घेतल्याने आणि आता सुप्रिया सुळे यांनी हे विधान केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सरकार पारदर्शीपणे काम करत असेल तर, ‘ईव्हीएम’ काय किंवा ‘बॅलेट’ पेपर वर निवडणूक घेण्यास सरकारला काय अडचण आहे, अशी विचारणाही त्यांनी केली. बारामती तालुक्यातील विविध गावांचा दौरा गुरुवारी सुळे यांनी केला. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हे विधान केले.‘बारामती विधानसभा निवडणूक लढविलेले राष्ट्रवादीचे उमेदवार युगेंद्र पवार यांना मतपडताळणी करू नका, असे मी सांगितले होते. ते एकाच उमेदवाराबाबत होते. खडकवासल्याचे उमेदवार सचिन दोडके यांच्याशीही मी चर्चा केली होती. मी स्वत: चारवेळा ईव्हीएमवर निवडून आले आहे. त्यामुळे त्यात घोटाळा आहे, असे मी कसे म्हणू शकेन,’ असे सुळे यांनी सांगितले. दरम्यान, बारामती विधानसभा मतदारसंघात पराभव झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मिळालेल्या मतांवर आक्षेप घेऊन राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी मतमोजणी पडताळणीसाठी केलेला अर्ज मागे घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर संशय घेतला जात असताना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी पराभूत उमेदवारांची दिल्ली येथे गेल्या आठवड्यात बैठक घेतली होती. मात्र, त्यानंतर युगेंद्र पवार यांनी अर्ज मागे घेतल्याने आणि आता सुप्रिया सुळे यांनी हे विधान केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### मी स्वत: ईव्हीएमवर निवडून आले

मी स्वत: चारवेळा ईव्हीएमवर निवडून आले आहे. त्यामुळे त्यात घोटाळा आहे, असे मी कसे म्हणू शकेन,’ असे सुळे यांनी सांगितले. दरम्यान, बारामती विधानसभा मतदारसंघात पराभव झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मिळालेल्या मतांवर आक्षेप घेऊन राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी मतमोजणी पडताळणीसाठी केलेला अर्ज मागे घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर संशय घेतला जात असताना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी पराभूत उमेदवारांची दिल्ली येथे गेल्या आठवड्यात बैठक घेतली होती.

## 3 नगरपरिषदांची मिळून स्वतंत्र महापालिका ?

# औद्योगिक क्षेत्रात नव्या महापालिकेसाठी हालचाली!

| पिंपरी-चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चाकण, आळंदी आणि राजगुरुनगर नगर परिषदा मिळून स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याच्या हालचालींना गती मिळाली आहे. स्वतंत्र महापालिका करण्यासाठी कोणतीही अडचण नाही. तीन नगरपरिषदांची मिळून स्वतंत्र महापालिकेची स्थापना करावी असा अभिप्राय पिंपरी-चिंचवड महापालिकेने शासनाला दिला आहे.**



पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात गावांचा समावेश होऊन महापालिकांची हद्दवाढ झालेली आहे. त्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या परिसरातील नवीन गावांचा या दोन्ही महापालिकेत समावेश करणे योग्य होणार नाही. चाकण नगरपरिषद, आळंदी नगरपरिषद व राजगुरू नगरपरिषद तसेच त्यांच्या लगतच्या परिसरातील गावांची नवीन महापालिका निर्माण करण्याबाबत मागणी होत आहे. चाकण, आळंदी आणि राजगुरू नगरपरिषद तसेच त्यांच्या परिसरालगतच्या आसपासच्या गावांचा समावेश करून नवीन स्वतंत्र महापालिका करणे राज्य शासनाच्या विचाराधिन आहे. त्यामुळे राज्य शासनाने चाकण नगरपरिषद, आळंदी नगरपरिषद व राजगुरू नगरपरिषद तसेच त्यांच्या लगतच्या परिसरातील आसपासच्या गावांचे एकूण क्षेत्रफळ, लोकसंख्या, हद्द याबाबतचा तपशिल, तिन्ही नगरपरिषदेतील हद्दीची एक स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याबाबत जिल्हा प्रशासन, महापालिकेकडून अभिप्रायासह अहवाल मागविला होता.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने अहवाल पाठविला आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ मोठे आहे. वाढत्या लोकसंख्येला सुविधा पुरविताना महापालिकेवर ताण येत आहे. या भागातील गावे महापालिकेत समाविष्ट करणे शक्य नाही. त्यामुळे चाकण, राजगुरुनगर, आळंदी नगरपरिषदांची मिळून स्वतंत्र महापालिका स्थापन करण्यास कोणतीही हरकत नसल्याचा अभिप्राय पिंपरी महापालिकेने दिला आहे. जिल्हा परिषद प्रशासनानेही अभिप्राय पाठविला आहे. त्यामुळे चाकण, आळंदी आणि राजगुरुनगर नगर परिषदा मिळून स्वतंत्र महापालिका स्थापन करण्याच्या हालचालींना गती मिळाली आहे.

### औद्योगिक पट्ट्यातील विकासाला चालना?

उद्योगामुळे चाकण परिसरातील लोकसंख्या वाढत आहे. परिसर विस्तारत आहे. वाढत्या लोकसंख्येला सुविधा पुरविताना चाकण, आळंदी आणि राजगुरुनगर या नगरपरिषदांवर ताण येत आहे. त्यामुळे स्वतंत्र महापालिकेची स्थापना झाल्यास या भागातील विकास कामांना चालना मिळण्याची शक्यता आहे. रस्ते, कचरा, पाणी यासह अन्य बाबींचे नियोजन करणे सुलभ होईल, अशी धारणा प्रशासनाची आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ मोठे आहे. त्यामुळे तिन्ही नगरपरिषदांची स्वतंत्र महापालिका स्थापन करण्यास कोणतीही हरकत नाही. तसा अभिप्राय शासनाला पाठविला असल्याचे महापालिकेच्या नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांनी सांगितले.

## पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात गावांचा समावेश

### उद्योगमंत्र्यांनी बैठक घेताच 'एमआयडीसी'तील प्रलंबित कामांना गती

भोसरीतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) स्थापनेपासून रखडलेल्या औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र अग्निशमन केंद्राच्या प्रस्तावाला गती मिळणार आहे. याबाबतची निविदा लवकरच प्रसिद्ध केली जाणार आहे. तसेच भूमिपूजनानंतर दीड वर्षांपासून रखडलेल्या सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांना गती मिळण्याची अपेक्षा उद्योजकांनी व्यक्त केली आहे.

एमआयडीसीच्या स्थापनेपासून औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र अग्निशमन केंद्राचे एच ब्लॉक येथे आरक्षण आहे. त्याबाबत सातत्याने बैठका झाल्या, पण प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली नाही. दोन दिवसांपूर्वी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बैठक घेऊन उद्योजकांच्या समस्या सोडविण्याचे निर्देश महापालिका प्रशासनाला दिले. त्यानंतर प्रशासनाने तातडीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अग्निशमन केंद्राची निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. लवकरच निविदा प्रसिद्ध केली जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

शहरातील उद्योगांमध्ये निर्माण होणाऱ्या रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिका, एमआयडीसी, पीसीएमसी सीईटीपी फाउंडेशन आणि एमपीसीबी यांच्या संयुक्त विद्यमाने भोसरी एमआयडीसीतील गवळी माथा येथील प्लॉट क्रमांक टी १८८/१ येथील एक एकर क्षेत्रात सरासरी एक दशलक्ष लिटर (एमएलडी) क्षमतेचा सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प गतवर्षी हाती घेतला होता. कामाचे भूमिपूजनही झाले. मात्र, औद्योगिक पाण्यावर प्रक्रिया कोणी करायची, कोणत्या उद्योगांमधून कोणत्या प्रकारचे रसायनमिश्रित पाणी येते याची तपासणी करण्यासाठी विलंब झाला. प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची उद्योजकांची मागणी होती. आता चार एकर क्षेत्रफळामध्ये २७ दशलक्ष लिटर क्षमतेचा सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे नियोजन सुरू आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) अंतिम टप्प्यात आहे.

---

## चारचाकींसाठी लवकरच नवीन मालिका

### आकर्षक क्रमांकासाठी अर्ज करण्याचे पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवाहन

| पिंपरी |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चारचाकी खासगी वाहनांसाठी लवकरच सुरू होणाऱ्या 'एमसी' या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन राखून ठेवण्याकरिता आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.**




मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक हवा असेल त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज आणि धनाकर्ष (डीडी) ३० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० दरम्यान कार्यालयात पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करणे आवश्यक राहील. सदर डीडी 'डी.वाय. आर.टी.ओ. पिंपरी चिंचवड' यांच्या नावे राष्ट्रीयकृत/ शेड्युल्ड बँकेचा पुणे येथील असावा. एकाच क्रमांकाकरिता जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी कार्यालयीन सूचनाफलकावर लावण्यात येईल.

या यादीतील अर्जदारांनी लिलावासाठी जास्त रक्कमेचा एकच डीडी ३१ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात घालून कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकारी यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तिसमोर लिफाफे उघडून ज्या अर्जदाराने जास्तीत जास्त रकमेचा धनाकर्ष (डीडी) सादर केला असेल त्यास पसंती क्रमांक वितरीत केला जाईल. लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने क्रमांक आरक्षित करण्यासाठी नागरिकांना उपलब्ध करण्यात येतील.

### 180 दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करावे

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेले शुल्क शासनाच्या तिजोरीत जमा होईल. अधिक माहितीसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये यांनी केले आहे.

# महापुरुषांच्या अवमानाची विकृत 'फॅशन'!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

> देशातील करोडो जनता ज्यांना मानते, ज्यांची भूमिका, ज्यांचा दृष्टिकोन समोर ठेवून त्यांच्या पावलावर पाऊल टाकते, त्या महापुरुषांच्या अवमानाची सध्या फॅशन बनली की काय ? असं वाटू लागलं आहे. हे महापुरुष म्हणजे अनेकांची दैवतं असतात, याचं भान देखील विटंबना करणाऱ्या किंवा अवमान करणाऱ्याला नसतं, ही खरी दुर्दैवाची गोष्ट आहे. पूर्वी, हे होत होतं, पण आज काल अवमानाची ही 'फॅशन' थेट संसदेमध्ये पोहोचली आहे, याचं जास्त वाईट वाटतं !

म्हणतात ना.. वाईट किंवा चांगल्या अर्थानं प्रसिद्धी मिळणं, याला हल्ली महत्त्व दिलं जातं. कुणी अर्वाच्य बोलून प्रसिद्धी मिळवतं, तर कुणी सरकारवर सतत खालच्या थराची टीका करून प्रसिद्धीच्या झोतात राहतं. काही विचारवंत किंवा आमची माध्यमं त्याला 'जीभ घसरली' असं म्हणून वेळ मारून नेतात. कोणी शब्दच्छल करत 'पॅशन' आणि फॅशन या दोन शब्दांभोवती पिंगा घालतं..!

काँग्रेसच्या दृष्टीनं विचार केला तर स्वातंत्र्यवीर सावरकर हे त्यांचं कायमचं अवमान करण्याचं हत्यार आहे. त्याचप्रमाणं, डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा छत्रपती शिवराय यांचा अवमान करण्याची संधी देखील अनेक राजकारणी सोडत नाहीत. त्यातून त्यांना शिव्या मिळतात तो भाग वेगळा, पण किमान आठ दिवस तरी संपूर्ण मीडियामध्ये त्यांचं नाव गाजत असतं, हे लक्षात घ्यायला हवं ! एखाद्या सुंदरशा प्रसंगात अथवा भाषणात या महापुरुषांच्या संदर्भात कोणी चांगलं बोलत असेल, तर त्याकडं दुर्लक्ष करायचं, आणि त्या भाषणातला एक शब्द घेऊन त्याचे उलट सुलट अर्थ लावायचे, अशा नेत्यांचा सर्वत्र सुळसुळाट झाला आहे, हे सर्वांच्याच लक्षात आलं असेल. संसदेमध्ये गृहमंत्री अमितभाई शाहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात सुंदर भाषण केलं, पण ते जे बोलले नव्हते, ते त्यांच्या तोंडी घालून विरोधकांनी संपूर्ण देशभर थयथयाट केला. काँग्रेस नेते तर नेहमीच स्वातंत्र्यवीरांचा अपमान करतात. किंबहुना, वारंवार अचूक संधी शोधून ते घाव घालतात. राहुल गांधी सारख्यांना स्वातंत्र्यवीरांची शौर्यगाथा माहित सुद्धा नसेल, पण, महाराष्ट्र दौऱ्यावर आल्यानंतर सावरकरांविषयी वाईट बोलले नाहीत, तर ते राहुल गांधी कसले ?

## दुर्दैवी प्रसंग परभणीचा..

संविधानाचा अवमान करण्याची घटना नुकतीच परभणीत घडली आणि संपूर्ण देश त्या मुद्द्यावर पेटून उठला. परभणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीचा अपमान करण्यात आला. यानंतर परभणी जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. बंद दरम्यान, आंबेडकरी अनुयायांनी रस्ता रोको करत काही भागांत दगडफेक केली तसेच तसेच टायर जाळले. यावेळी पोलीस प्रशासन 'ॲक्शन मोड' वर होते. एकूणच सगळीकडील कलुषित वातावरण पाहता परभणीमधील इंटरनेटची सुविधा खंडित करण्यात आली. त्या ठिकाणी जमावबंदी जाहीर करण्यात आली.

हिंसक घटनांमुळे अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, मुळात राष्ट्रपुरुषांची स्मारके, प्रतिमा, संदर्भातील वास्तू यांचे प्राणपणाने जतन करणे, हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आजच्या काळात राष्ट्रपुरुषांच्या कार्याची, विचारांची आपण कधीही बरोबरी करू शकत नाही, त्यांच्याइतकी वैचारिक उंची आपण गाठू शकत नाही, त्यांचे कार्य लौकिक अर्थाने अलौकिक असेच असते. पण, समाजातील विघातक अपप्रवृत्ती, नराधम मात्र कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यासाठी, समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करण्यासाठी, समाज व्यवस्थेमध्ये वादंग पसरविण्यासाठी असे कृत्य करून आसुरी आनंद मिळवत असतात, पण ही एक प्रकारची विकृती आहे, हे त्यांना समजावून कोण सांगणार?

## एक गोष्ट लक्षात घ्या, या विकृतांच्या आसुरी

आनंदाची समाजव्यवस्थेला फार मोठी किंमत मोजावी लागते, झालेली हानी भरून निघते, पण समाजामध्ये निर्माण झालेली तेढ, भावनिक जखमा भरून निघण्यास अनेक वर्षे निघून जातात. भारतीय समाज हा संवेदनशील व भावनाशील आहे. त्यात भारतामध्ये विविधतेतून एकता हे पालुपद वारंवार आळविले जात असले, तरी हे वाक्य सुभाषित म्हणून केवळ भिंतीवरच आजच्या काळात शोभून दिसते, तशा अर्थाचे वागणे मात्र कोणाकडे दिसत नाही. विविध जातीधर्मियांचा भारतात समावेश असला, तरी भारतीय समाज आजही जाती-धर्माच्या चौकटीतच अडकला असून बंधनातच विखुरला गेला आहे. त्या जातीधर्माच्चौकटी तोडून तो आजही देशाचा, देशाच्या अखंडतेचा विचार करत नाही, ही वास्तवता असली तरी खऱ्या अर्थाने ती एक शोकांतिकाच आहे. राष्ट्रपुरुषांची देखील वाटणी केली.



## आमची शोकांतिका काय आहे?

राष्ट्रपुरुषदेखील आम्ही भारतीयांनी जातीधर्मात वाटून घेतले आहे. त्यामुळे राष्ट्रपुरुषदेखील जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त झाले आहेत. किंबहुना, राजकीय फायदा उठवण्यासाठी अनेकांना ते जाती-धर्मातच बंदिस्त हवे आहेत !

भारताची राज्यघटना ज्यांनी लिहिली, ते राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देखील मागासवर्गीय एक-दोन जातीपुरतेच सीमित झाले असल्याचे वातावरण आज निर्माण झाले आहे. मुळातच डॉ. बाबासाहेब अबिडकर यांचे कार्य व जीवनपट पाहता प्रत्येक भारतीयांचे या विचारपर्वाचे देव्हाऱ्यांमध्ये देवाबरोबर पूजन केले पाहिजे, त्यांचे स्मरण केले पाहिजे. पण, त्यांनाही जातीच्या वेष्टनाचा विळखा पडल्याने डॉ. आंबेडकर आजच्या समाजाला समजू शकले नाहीत. महात्मा ज्योतिबा फुले हे माळी समाजाचे, छत्रपती शिवाजी महाराज मराठा समाजाचे, लोकमान्य टिळक ब्राह्मण.. असे जातीचे लेबल महापुरुषांना लावण्यात आले. मुळात महापुरुषांना जाती-धर्माच्या चौकटीमध्ये अडकवून ठेवण्याचा आम्हाला कोणी अधिकार दिला?

## राजकीय स्वार्थासाठी षडयंत्रे

महापुरुषांच्या स्मारकांची विटंबना, त्यांच्याशी संबंधित साहित्याची अथवा वस्तूची विटंबना ही नक्कीच संवेदनशील व अक्षम्य बाब आहे. अशी निंदनीय घटना करणारा विकृत कोणत्याही जातीचा-समाजाचा असो, त्याला कदापि माफी मिळू नये. अशा घटना घडवून आणण्यामागे कोणाचे तरी षडयंत्र असते. समाजात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण व्हावा, जातीय दंगली व्हाव्यात, जाती-जातींमध्ये वाद निर्माण व्हावेत, हा हेतू अशा घटना घडवून आणण्यामागे त्या अपप्रवृत्तींचा असतो. त्यांच्या याच कुटिल खेळीला आपण बळी पडतो, हे मात्र आपले दुर्दैव.. आणि यातूनच त्या विकृत नराधमांचा हेतू साध्य होतो.

मुळातच अशा घटना घडल्यानंतर सर्वप्रथम आम्ही भारतीयांनी थंड डोक्याने अशा घटनांचा आढावा घेऊन शोध घेतल्यास त्या नराधमांना धडा शिकविणे अवघड जाणार नाही. अशा घटना घडताच आपण संयम व सहनशीलता गमावून बसतो व त्यातूनच उद्रेक जन्म घेतो. जमावाला डोके नसते आणि रागाला विचार करता येत नाही. अशाच घटनांना यातून खतपाणी नकळत घातले जाते. राष्ट्रपुरुषांची स्मारके पुन्हा उभारली जातील, पण समाजव्यवस्थेचे रागाच्या भरात झालेले नुकसान पुन्हा भरून येणे शक्य नाही. राष्ट्रपुरुषांच्या कार्याचे व विचारांचे संवर्धन झाल्यास आपला समाज नजीकच्या काळात नक्कीच सुजलाम सुफलाम होईल. मुळातच राष्ट्रपुरुषांचे कार्य, त्यांचा जीवनपट आजही अनेकांना माहिती नसतो, केवळ तो कोणीतरी मोठा माणूस आहे आणि आपल्या समाजाचा आहे व अशा घटनांतून आपल्या समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा विचार डोक्यात ठेवून समाज रस्त्यावर उतरतो. मुळातच राष्ट्रपुरुषांना विशिष्ट जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त करण्याचे पातक आम्ही करत आहोत, असा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. एखादा कृत्य करतो, परंतु राष्ट्रपुरुषांना, त्यांच्या कार्याला, जीवनपटाला विशिष्ट जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त करण्याचे पातक आम्ही वर्षानुवर्षे करत आहोत. आम्हीही तितकेच दोषी आहोत, हे नव्या पिढीला समजावून सांगायला हवे. अशा घटनांना पायबंद बसणे काळाची गरज आहे. घटना घडल्यावर उद्रेक न करता शांतपणे विचार करून संयम दाखविल्यास गुन्हेगारांना धडा शिकविणे सोपे जाते व समाजाचे नुकसानही टळू शकते.

राष्ट्रपुरुषांची विटंबना करणे किंवा अवमान करणारे शब्द उच्चारणे, ही विकृती ठेचण्यासाठी सरकारने कायदे आणखी कडक करायला हवेत. या कायद्यांची जरब सुद्धा प्रचंड हवी, जेणेकरून ते कृत्य करण्यापूर्वी शिक्षेची दाहकता संबंधितांना लागायला हवी. अशा प्रकारची विकृती समाजात फोफावत चालली आहे, आणि त्यातून मार्ग काढण्याचे अवघड आव्हान केंद्र आणि राज्य सरकारांवर आहे. अर्थात दोन्ही ठिकाणी सध्या भारतीय जनता पार्टी प्रणित युतीचे सरकार सत्तेवर आहे, त्यामुळे समन्वयाने मार्ग काढून, कायदे कठोर आणि कडक करून ही विकृती मात्र ठेचायला हवी, एवढीच छोटीशी सूचना !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कायदा सुव्यवस्थेचे तीन-तेरा!

## राजगुरुनगरमध्ये दोन सख्ख्या बहिणींवर अत्याचार करुन हत्या

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**वाडा रोडवर दोन लहान मुलींवर अत्याचार करुन त्यांची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या दोन्ही सख्या बहिणींवर अत्याचार करून त्यांना पाणी भरण्याच्या ड्रममध्ये भरून ठेवल्याचा भयानक आणि किळसवाणा प्रकार शहरातील वाडा रस्त्यावरील मोठ्या वर्दळीच्या ठिकाणी गुरुवार (दि. २६) रोजी उघडकीस आला आहे. नऊ आणि आठ वर्षांच्या या मुली ज्या ठिकाणी राहायला आहेत, तेथून जवळच असलेल्या एका बिअर बारमध्ये काम करीत असलेल्या परप्रांतीय मुलांच्या खोलीत मुलींचे मृतदेह पोलिसांना मिळुन आले असल्याचे समजते.**



### कठोर शिक्षा झाली पाहिजे : फडणवीस

अटकेत असलेल्या विशालच्या पत्नीला (साक्षी) पतीसोबत न्यायालयात नेलं जाणार असल्याचं समजलं. त्यानंतर तिनं पोलिसांना आपल्याला त्याच्यासमोर न नेण्याची विनंती केली. मी विशालसमोर गेल्यास तो मलादेखील ठार मारेल अशी भीती साक्षीनं व्यक्त केली. यामुळे पोलिसांनी तिला महिला पोलिसांसोबत न्यायालयात हजर केलं. 'मी त्याला गुन्ह्यात साथ देण्यास नकार दिला असता तर त्यानं त्या मुलीबरोबर मलादेखील ठार मारलं असतं. म्हणूनच त्याच्या गुन्ह्यात मी त्याला साथ दिली, अशी माहिती साक्षीनं पोलीस चौकशीत दिली. आरोपी विशाल गवळीची पत्नी साक्षी गवळी बँकेत नोकरी करते. विशालनं १३ वर्षीय मुलीची बलात्कार करुन हत्या केली. त्यावेळी साक्षी घरात नव्हती.

या दोन्ही मुली बुधवारी दुपारी खेळताना गायब झाल्यावर शोध घेण्यात आला. मात्र त्या न भेटल्यामुळे पालकांनी संध्याकाळी खेड पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार दिली होती. या दोघी सख्ख्या बहिणी असून बाहेरगावाहून मोलमजुरीसाठी आलेल्या कुटुंबातील या मुली असल्याचे समजते. हरवलेल्या मुलींचा तपास करताना खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीनुसार खेड पोलीसांनी मुलींच्या कुटुंबाचे वास्तव्य असलेल्या चाळीलगतच्या बिअर बारमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या खोलीची झडती घेतली. त्यावेळी दीड ते दोन फुट पाणी असलेल्या एका ड्रममध्ये दोन्ही मुली मृत अवस्थेत आढळून आल्या असल्याचे सांगण्यात आले. दोघींचे मृतदेह चांडोली ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून याबद्दल पोलिस निरिक्षक प्रभाकर मोरे यांनी माहिती दिली आहे. राजगुरुनगर येथील धनराज बारमधील वेटरने हे खून केले असून पहाटे चारच्या सुमारास पुण्यातील एका लॉजवरून त्याला अटक करण्यात आले. संशयित आरोपी हा ५० ते ५५ वर्षाचा असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर गुन्हा गंभीर असल्याने पोलिसांनी लगेच माहिती देण्यास नकार दिला. तपास सुरु असून खून का करण्यात आला? याची अजून कोणतीही माहिती पोलिसांकडून उपलब्ध झाली नाही. मावळ तालुक्यातील विसापूर किल्ला परिसरात आई- वडिलांसोबत फिरण्यासाठी आलेल्या पाच वर्षाच्या चिमुकलीवर बंदोबस्तावर असलेल्या पोलिसाने लैंगिक अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून आडोशाला नेऊन तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी संबंधित पोलिसाला अटक केली आहे. ही धक्कादायक घटना बुधवारी (दि. 25) घडली. सचिन वसंत सस्ते असे अटक केलेल्या आरोपी पोलिसाचे नाव आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विसापूर किल्ला पाहण्यासाठी पाच वर्षीय चिमुकली तिच्या आई- वडिलांसोबत आली होती. त्या चिमुकलीला सचिन सस्ते याने चॉकलेटचा आमिष दाखवले आणि आडोशाला नेले. तिथे तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार मुलीने आपल्या पालकांना सांगितला. पालकांनी तात्काळ पोलिसात धाव घेत गुन्हा दाखल केला. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी पोलीस सचिन सस्ते याला अटक केली आहे. पोलिसाकडून कृत्ये झाल्याने रक्षकच झाले भक्षक यामुळे सर्वच स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची हत्या करणाऱ्या आरोपी विशाल गवळीला पोलिसांनी अटक केली आहे. कल्याणमध्ये घडलेल्या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला. मुलीचा मृतदेह टाकून देताना विशाल गवळीला त्याच्या पत्नीनंदेखील साथ दिली. तिलाही पोलिसांनी अटक केली आहे. बलात्कार, हत्येनंतर विशाल गवळी फरार झाला. त्यानं कल्याणहून शेगाव गाठलं. तिथे त्याच्या पत्नीचं माहेर आहे. विशालला शेगावमधूनच अटक करण्यात आली. आता त्याची रवानगी पोलीस कोठडीत करण्यात आली आहे. १३ वर्षीय मुलीची हत्या करणाऱ्या नराधम विशाल गवळीला आज कोळसेवाडी पोलिसांनी प्रचंड पोलीस बंदोबस्तात कल्याण न्यायालयात हजर केलं. न्यायालयानं त्याला २ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे निर्देश दिले.

---


# पाऊस आणि गारपीट असं दुहेरी संकट!

## राज्यात थंडीला ब्रेक: रब्बी पिकांना बसू शकतो मोठा फटका

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राज्यात थंडीला ब्रेक लागण्याची शक्यता आहे, पुढील दोन दिवस महाराष्ट्रासाठी धोक्याचे असून, आयएमडीकडून हवामानाबाबत मोठी अपडेट देण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी चिंता वाढवणारी बातमी आहे, गेल्या आठवड्यात थंडीचा कडाका चांगलाच वाढ होता, थंडी रब्बी पिकांसाठी पोषक मानली जाते. मात्र आत थंडीला ब्रेक लागणार असून, पुन्हा एकदा हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे.**

काही ठिकाणी पावसाला सुरुवात झाली आहे तर काही ठिकाणी ढगाळ वातावरण आहे.हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार जर राज्यात पाऊस झाला तर याचा मोठा फटका हा रब्बी पिकांना गहू, ज्वारी या सारख्या पिकांना बसू शकतो. सध्या उत्तरेकडून वारे वाहत आहेत, याचा परिणाम म्हणजे राज्यातील थंडी गायब झाली असून, पावसाला पोषक वातावरण निर्माण झालं आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून, यामुळे राज्यात पुढील दोन दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये हवामान



विभागाकडून गारपिटीचा देखील इशारा देण्यात आला आहे. एकीकडे पाऊस तर दुसरीकडे गारपीट असं दुहेरी संकट महाराष्ट्रावर असणार आहे. उत्तर भारतात येणारे कोरडे थंड वारे आणि अरबी समुद्रातून येणारी बाष्पयुक्त हवा यामुळे महाराष्ट्रात पावसाची शक्यता निर्माण झाली आहे, गेल्या दोन दिवसांपासून राज्याच्या अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरण आहे. ढगाळ वातावरणामुळे हरभऱ्यासारख्या पिकांवर अळीचा प्रादुर्भाव होण्याची देखील शक्यता आहे, याचा मोठा फटका हा शेतकऱ्यांना बसू शकतो. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात पुढील दोन ते तीन दिवस गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मात्र त्यानंतर तीस डिसेंबरपासून राज्यात पुन्हा एकदा थंडीचा कडाका वाढणार आहे.

### कुठे गारपीटीसह पाऊस होणार?

महाराष्ट्रात 27 आणि 28 डिसेंबरला गारपीटीसह पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हिवाळ्यात गारपीट होणार असल्याने पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कृषि विभागाने शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात खान्देश, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात 27 ते 29 डिसेंबर या काळात मेघगर्जना, गारपीटीसह पाऊस होऊ शकतो. नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर तसेच दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये 27 डिसेंबर रोजी दुपारपासून बदल होण्यास सुरुवात होईल.

# सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा!

## बेळगावची काँग्रेसच्या कार्यकारिणीची सभा रद्द

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचे माजी पंतप्रधान, अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचं वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झालं. वृद्धापकाळाने त्यांची दिल्लीतील एम्स रुग्णालयात प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने अवघ्या देशावर शोककळा पसरली आहे. त्यामुळे उद्या (२७ डिसेंबर) आयोजित केलेले सर्व शासकीय कार्यक्रम रद्द करण्यात आली आहेत. शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याची माहिती पीटीआयने दिली आहे.**




मनमोहन सिंग यांना रात्री ८ वाजता आपत्कालीन परिस्थिती दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरू असताना रात्री ९.५१ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.मनमोहन सिंग ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे १० वर्षे देशाचा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ असे दहा वर्ष ते देशाचे पंतप्रधान होते. तसेच १९९८ ते २००४ या काळात ते राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेही होते.३३ वर्षांपूर्वी म्हणजे १९९१ साली डॉ. मनमोहन सिंग यांनी राज्यसभेच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. चार महिन्यातच त्यांनी माजी पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री म्हणून शपथ घेतली. भारताने आपले सर्वात प्रतिष्ठित नेते डॉ. मनमोहन सिंग यांना गमावलं आहे. नम्रपणा जोपसणारे मनमोहन सिंग सन्माननीय अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी विविध सरकारी पदांवर तसेच अर्थमंत्री म्हणून काम केले आणि गेल्या काही वर्षात आमच्या आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवला. संसदेतील त्यांचा हस्तक्षेपही अभ्यासपूर्ण होता. आपले पंतप्रधान या नात्याने त्यांनी लोकांचे जीवन सुधारण्यासाठी व्यापक प्रयत्न केले”, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. राजकारणात फार कमी लोकांनी सरदार मनमोहन सिंग यांच्याप्रमाणे आदर मिळतो. त्यांचा प्रामाणिकपणा आमच्यासाठी नेहमीच प्रेरणादायी असेल आणि या देशावर खरोखर प्रेम करणाऱ्यांमध्ये ते कायम उभे राहतील. विरोधकांच्या अन्यायकारक आणि गंभीर वैयक्तिक हल्ल्यांना बळी पडूनही राष्ट्रसेवेच्या आपल्या वचनबद्धतेत ते स्थिर राहिले. ते खऱ्या अर्थाने समतावादी, हुशार, प्रबळ इच्छाशक्ती आणि शेवटपर्यंत धैर्यवान होते. राजकारणाच्या खडबडीत जगातला एक अनोखा प्रतिष्ठित आणि सभ्य माणूस असे मनमोहन सिंग होते.देशाचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांच्या निधनाची बातमी अतीव दु:खदायक आहे. आधी केंद्रीय वित्तमंत्री आणि नंतर पंतप्रधान असताना देशाच्या आर्थिक विकासाला वेग देणारी दमदार पाऊले उचलून देशाच्या अर्थव्यवस्थेचे नवे दालन खुले करणारा क्रांतिकारक निर्णय घेणारा द्रष्टा नेता अशी त्यांची ओळख इतिहासात कायम राहील. अत्यंत साध्या, सरळ आणि शांत स्वभावाचे डॉ.मनमोहन सिंह हे एक नामवंत अर्थतज्ज्ञ म्हणून जागतिक स्तरावर ओळखले जात होते. त्यांच्या निधनाने एक धोरणी आणि हुशार असे अर्थतज्ज्ञ, राजकीय नेतृत्व हरपले आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती मिळो, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याकरता बळ मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली”, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झालं आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे आज (२६ डिसेंबर) त्यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्यत मालवली.मनमोहन सिंग यांना रात्री ८ वाजता आपत्कालीन परिस्थिती दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरू असताना रात्री ९.५१ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली. यानंतर लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी मनमोहन सिंग यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. माझे आदर्श हरपल्याची भावना राहुल गांधींनी व्यक्त केली आहे.

### अनेक महत्त्वाची पदे भूषवली

डॉ. मनमोहन सिंग यांनी अर्थमंत्रालयात अनेक महत्वाची पद भूषवली. यात अर्थ मंत्रालयाचे सचिवपद , नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद या पदांचा समावेश होता. यानंतर 1991-1996 या पाच वर्षांच्या काळात ते भारताचे अर्थमंत्री होते. हा काळ स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानला जातो. डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले धोरण तयार केले.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीत त्यांना अनेक महत्वाचे पुरस्कार मिळाले. डॉ. मनमोहन सिंग यांना 1987 या काळात भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण पुरस्कार मिळाला. त्यानंतर भारतीय विज्ञान कॉंग्रेस मध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्मशताब्दी सन्मान(1995), अर्थमंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवार्ड (1993 आणि 1994), केम्ब्रिज विद्यापीठाचा ॲडम स्मिथ पुरस्कार (1956), केम्ब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल राईट पुरस्कार असे काही विशेष पुरस्कार मिळाले.

---

# जाहिरातीवरून डाबर आणि पतंजली भिडले!

## बाबा रामदेव यांच्या कंपनीला दिल्ली उच्च न्यायालयाचे समन्स

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली उच्च न्यायालयाने जाहिरातींमध्ये डाबर कंपनीच्या च्यवनप्राशची कथितरित्या बदनामी केल्या प्रकरणी दाखल प्रकरणात, पतंजली आयुर्वेद कंपनीला आपले म्हणणे स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायधीश मिनी पुष्करणा यांनी २४ डिसेंबर रोजी प्रतिवादी पतंजली आयुर्वेद आणि पतंजली फूड्स लिमिटेड यांना समन्स जारी करत या प्रकरणी उत्तर देण्यास सांगितले आहे.**



दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशात तक्रार ही खटला म्हणून नोंदवून घेत समन्स बजावण्यात यावे असेही म्हटले आहे. तसेच प्रतिवाद्यांना आजपासून ३० दिवसांच्या आत लिखित म्हणणे मांडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.डाबर कंपनीने आरोप केला होता की, ‘पतंजली स्पेशल च्यवनप्राश’ची जाहिरात करताना खोटे आणि जणीवपूर्वक आरोप करण्यात आले, ज्यामुळे त्यांचे उत्पादन डाबर च्यवनप्राशची बदनामी झाली. डाबर च्यवनप्राश हे ६० टक्क्यांहून अधिक हिस्सेदारीसह बाजारातील सर्वात प्रसिद्ध उत्पादन आहे. तसेच न्यायालयाकडून अंतरिम दिलासा मिळावा अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर देखील नोटीस जारी करण्यात आली असून पुढील सुनावणीसाठी ३० जानेवारी ही तारीख निश्चित केली आहे.या याचिकेत म्हटले आहे की, जाहिरातींमध्ये प्रतिवादींनी दावा केला आहे फक्त पतंजली स्पेशल च्यवनप्राशच अस्सल आहे. त्यामुळे हे विशेष आणि सर्वोत्तम च्यवनप्राश आहे, जे चरक, सुश्रुती, धन्वंतरी, च्यवन ऋषि यांनी सांगितलेल्या विधीनुसार तयार करण्यात आले आहे आणि इतर च्यवनप्राश निर्मात्यांना याबद्दल कसलीच माहिती नाही आणि त्यामुळे ते सर्वसाधारण आहेत. फिर्यादीत म्हटले आहे की, प्रतिवादींनी टीव्हीसी आणि प्रिंट जाहिरातींमध्ये दावा केला आहे की इतर आयुर्वेदिक पुस्तकांना बिनकामाचे म्हटले आहे. याचिकेत प्रतिवादींना च्यवनप्राश- डाबर च्यवनप्राशसह दावा करणाऱ्याच्या प्रतिष्ठेला हानी पोहचवणाऱ्या जाहिराती टीव्ही किंवा इतर माध्यमातून प्रसारित करण्यावर बंदी घालण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

### 30 जानेवारी ही तारीख निश्चित

डाबर कंपनीने आरोप केला होता की, ‘पतंजली स्पेशल च्यवनप्राश’ची जाहिरात करताना खोटे आणि जणीवपूर्वक आरोप करण्यात आले, ज्यामुळे त्यांचे उत्पादन डाबर च्यवनप्राशची बदनामी झाली. डाबर च्यवनप्राश हे ६० टक्क्यांहून अधिक हिस्सेदारीसह बाजारातील सर्वात प्रसिद्ध उत्पादन आहे. तसेच न्यायालयाकडून अंतरिम दिलासा मिळावा अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर देखील नोटीस जारी करण्यात आली असून पुढील सुनावणीसाठी ३० जानेवारी ही तारीख निश्चित केली आहे.

# टॉप १० यादीत 'या' अभिनेत्रीने गाठलं पहिलं स्थान

२०२४ या वर्षात प्रेक्षकांना बॉलीवूडमध्ये अनेक बदल पाहायला मिळाले. काही चित्रपट तुफान गाजले, तर काही चित्रपटांवर फ्लॉपच्या पाट्या लागल्या. अनेक कलाकारांचे सिनेमे सुपरहिट ठरले, तर यावर्षी स्टारकिड्सच्या पलीकडे जाऊन बॉलीवूडमध्ये काही नवोदित चेहऱ्यांची देखील ओळख निर्माण झाली. IMDB ने २०२४ मध्ये सर्वाधिक चर्चेत आणि प्रसिद्धीझोतात राहिलेल्या भारतीय कलाकारांची नावं जाहीर केली आहेत. यामध्ये टॉप-१० च्या यादीत कोणाला कितवं स्थान मिळालंय, जाणून घेऊयात... IMDB ही संस्था जगभरातील २५ कोटींहून ( दरमहा ) अधिक दर्शकांच्या आधारे ही क्रमवारी ठरवते. २०२४ या



वर्षात आलिया भट्ट, दीपिका पादुकोण या टॉपच्या अभिनेत्रींना मागे काढत तृप्ती डिमरी सर्वाधिक चर्चेत राहिल्याचं समोर आलं आहे. यंदा 'बॅड न्यूज', 'विकी विद्या का वो वाला व्हिडीओ', 'भुल भुलैया ३' या तीन सिनेमांमध्ये तिने मध्यवर्ती भूमिका साकारल्या होत्या. IMDB

इंडियाच्या प्रमुख यामिनी पतोडिया याबद्दल म्हणतात, "२०२४ ची सर्वाधिक प्रसिद्ध भारतीय कलाकारांची यादी पाहिल्यास यामध्ये भविष्यातील प्रतिभावान कलाकारांचा समावेश असल्याचं स्पष्ट होतं. याशिवाय भारतीय मनोरंजन विश्वात किती वैविध्यपूर्णता आहे याचीही प्रचिती येते. यंदाच्या यादीत शाहरुख खान, ऐश्वर्या राय बच्चन यांसारख्या दिग्गज कलाकारांसह तृप्ती डिमरी आणि शर्वरीसारख्या नवोदित अभिनेत्री असणं ही खूप मोठी गोष्ट आहे. भारतीय चित्रपट व आपल्या कलाकारांना मिळणारी आंतरराष्ट्रीय मान्यता दिवसेंदिवस कशी वाढत आहे, हे सुद्धा या वर्षीच्या टॉप-१० कलाकारांच्या यादीमधून स्पष्ट होत आहे."

# एका किसिंग सीनसाठी घेतलेले तब्बल 37 रिटेक



बॉलीवूडमध्ये दरवर्षी अनेक रोमँटिक चित्रपट तयार होतात. आजकाल बऱ्याच चित्रपटांमध्ये रोमँटिक व किसिंग सीन असतात. असे सीन शूट करणं खूप अवघड असतं. अनेकदा कलाकार एकमेकांबरोबर कंफर्टेबल नसतात, त्यामुळे सीन नीट शूट होत नाही आणि रिटेक घ्यावे लागतात. अशाच एका सीनचा किस्सा बॉलीवूडमध्ये खूप गाजला होता. एका चित्रपटातील किसिंग सीनसाठी अभिनेत्याने तब्बल ३७ रिटेक घेतले होते. या चित्रपटातील बॉलीवूड अभिनेत्याने आतापर्यंत १८ चित्रपटांमध्ये काम केलं आहे. त्यापैकी आठ चित्रपट सुपरहिट झाले आणि तीन चित्रपटांनी जबरदस्त कमाई केली, तसेच अनेक रेकॉर्ड मोडले. बॉलीवूडचा चॉकलेट बॉय असलेल्या या अभिनेत्याने एका रोमँटिक सीनसाठी एक दोन नव्हे तर तब्बल ३७ रिटेक घेतले होते. इतके रिटेक या चित्रपटातील अभिनेत्रीमुळे घ्यावे लागले, असं त्याने म्हटलं होतं.ही गोष्ट १० वर्षांपूर्वी म्हणजेच २०१४ मधील 'कांची: द अनब्रेकेबल' चित्रपटाची आहे. या चित्रपटात अभिनेत्री मिष्टी चक्रवर्ती व कार्तिक आर्यन यांच्या मुख्य भूमिका होत्या. या चित्रपटात कार्तिकने एका प्रेमात पडलेल्या तरुणाची भूमिका साकारली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुभाष घई यांनी केले होते. या चित्रपटात एक किसिंग सीन होता, ज्यामुळे कार्तिक नाराज झाला होता.कार्तिक आर्यनने एका मुलाखतीत या किसिंग सीनबद्दल सांगितलं होतं. "हा किसिंग सीन एवढा मोठा डोकेदुखी ठरेल, असं मला कधीच वाटलं नव्हतं. त्या दिवशी आम्ही प्रेमी युगुलांसारखे वागत होतो. पण एक सीन नीट शूट व्हावा, यासाठी आम्हाला ३७ रिटेक करावे लागले. शेवटी सुभाषजी आले

# त्यांनी थोडी गुन्हा केला

बॉलीवूड अभिनेता अरबाज खान काही दिवसांपासून चर्चेत आहे अरबाज खानने 24 डिसेंबर रोजी मेकअप आर्टिस्ट शूरा खानसोबत दुसरे लग्न केले आहे. हा निकाह बहीण अर्पिता खानच्या मुंबईतील घरी पार पडला आहे. या आनंदात सामील होण्यासाठी अरबाज खानचा मोठा भाऊ आणि बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खानसह त्याचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. तर अरबाजचा मुलगा अरहानही त्याच्या लग्नात नाचताना दिसला. अरबाद आणि शूराच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अरबाज आणि शूराने त्यांच्या नात्याबद्दल मौन पाळले होते. कुणाला या लग्नाची कल्पना नव्हती. आता अरबाजचे वडील सलीम खान यांनी मुलाच्या लग्नानंतर प्रतिक्रिया दिली आहे. लग्न करणे हा कोणताही गुन्हा नाही. त्यांच्या निर्णयामुळे आम्ही सर्वच आनंदी असल्याचे त्यांनी सांगितले. सलीम खान म्हणाले की, "त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

# रियाला कोर्टाचा मोठा दिलासा !

प्रसिद्ध अभिनेत्री रिया चक्रवर्तीच्या बाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. त्यात मुंबई उच्च न्यायालयानं रियाला दिलासा दिला आहे. रियाच्या परदेशवारीवर निर्बंध घालण्यात आले होते. यापुढील काळात रियाला परदेशात जाता येणार असून त्यावर कोणत्याही प्रकारची बंदी असणार नाही. असे कोर्टानं सांगितले आहे. बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंग राजपूतच्या आत्महत्या प्रकरणानंतर रिया ही नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत राहिली आहे. तिची वेगवेगळ्या तपास यंत्रणांनी देखील चौकशी केली आहे. काही दिवसांपूर्वी सीबीआयकडून रियाच्या विरोधात लूक आऊट नोटीस जाहिर करण्यात आली होती. त्यात तिला परदेशी जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. यावर हायकोर्टानं तिला दिलासा दिला आहे. रियानं मुंबई उच्च न्यायालयात सीबीआयच्या लूक आऊट नोटीशीच्या विरोधात याचिका दाखल केली होती. त्यात तिनं आपल्याला परदेशी प्रवास करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी मागणी तिनं कोर्टाकडे केली होती. कोर्टानं आता तिला परदेश प्रवासासाठी परवानगी दिली आहे. यामुळे रियाला दुबईतील एका ब्रँडच्या इव्हेंटसाठी जाता येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार कोर्टानं रियाला २७ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान विदेश यात्रा करण्याची परवानगी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून सीबीआयच्या लूक आऊट नोटीशीमुळे रिया ही अडचणीत सापडली होती.



# उर्फी रेस्टोबॉरमध्ये झाली वेटर; खरं कारण सांगताच लोकांनी केलं कौतुक

उर्फी जावेद तिच्या अतरंगी फॅशनमुळे सोशल मीडियावर चर्चेत असते. उर्फीच्या फॅशनचं कौतुक कमी तर टिका जास्त होत असते. पण अशातच एका कारणामुळे उर्फीचं कौतुक झालंय. मुंबईतील रेस्टोबार 'द नाइन्स' इथला उर्फी जावेदचा वेटर बनल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. ती वेटर का बनली होती? हा प्रश्न सगळ्यांना पडला होता. पण आज उर्फीने स्वतःच या व्हिडिओमागचं खास कारण सांगितलं आहे. उर्फीच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये ती वेटर बनून लोकांना प्रेमाने जेवण सर्व्ह करताना दिसतेय. याशिवाय ती लोकांसोबत आपुलकीने गप्पा मारतानाही दिसतेय. उर्फीचा वेटर बनल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून यावर अनेक प्रतिक्रिया आल्या. आज तिने इंस्टाग्रामवर ही खास गोष्ट उघड करताना सांगितलं की, तिने कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनसाठी निधी



उभारण्यासाठी वेट्रेस होण्याचा निर्णय घेतला होता. तिच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओ कॅप्शनमध्ये तिने खुलासा केला आहे. उर्फी लिहीते, "स्वप्न साकार झालं! कोणतेही काम मोठे किंवा लहान नसते. ते सर्व दृष्टीकोनावर अवलंबून असते. मला एक तास वेट्रेस म्हणून काम करायचं होत आणि कॅन्सर पेशंट एड असोसिएशनमध्ये निधी देण्यासाठी मी ही हक्काची कमाई केली. @CPAAINDIA @SUVED @THENINESMUMBAI यांना हे घडवून आणल्याबद्दल त्यांचे खूप आभार." असं कॅप्शन देत उर्फीने हा खुलासा केलाय. अभिनेत्री उर्फी जावेदचे हे पाऊल अनेकांना प्रेरणा देणारे आहे. तिला या ख्रिसमसमध्ये काहीतरी अर्थपूर्ण करुन सिक्रेट सांता बनून लोकांना मदत करायची होती. तिने त्या रात्री हॉटेलमधल्या कर्मचाऱ्यांशी खूप छान संवाद साधला. याशिवाय तिने काही टिप्स घेतल्या. या टिप्सचा वापर ती आता कर्करोगाच्या रुग्णांना मदत करण्यासाठी करणार आहे.

# ऑस्ट्रेलियाचे भारतावर वर्चस्व!

## लाइव्ह सामन्यात रोहित यशस्वी जैस्वालवर संतापला?

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटी सामना मेलबर्नमध्ये खेळला जात आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलिया संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत आहे. ऑस्ट्रेलियान पहिल्या दिवशी भारतावर वर्चस्व गाजवताना ६ बाद ३११ धावा केल्या. या दरम्यान क्षेत्ररक्षण करताना कर्णधार रोहित शर्मा सहकारी खेळाडू यशस्वी जैस्वालवर चिडताना दिसला. यावेळी रोहित जैस्वालला खडसावतानाचा आवाज आवाजही स्टंप माईकमध्ये कैद झाला. ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.**




वास्तविक, जेव्हा स्टीव्ह स्मिथ आणि मार्नस लबूशेन फलंदाजी करत होते, तेव्हा रोहितने जैस्वालला फलंदाजाच्या अगदी जवळ क्षेत्ररक्षण करण्यासाठी उभे केले होते. यावेळी जैस्वाल हा चेंडू त्याच्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच हवेत उडी मारताना दिसल्याने रोहित शर्मा संतापला. रोहित जैस्वालला म्हणाला, "अरे जस्सू, तू गल्ली क्रिकेट खेळतोयस का? जोपर्यंत फलंदाज खेळत नाही तोपर्यंत उठायचे नाही." रोहितचा हा आवाज स्टंप माईकमध्ये कैद झाला."खरं तर, अनेक वेळा फलंदाजाच्या जवळचा क्षेत्ररक्षक क्षेत्ररक्षण करताना गुडघ्यावर हात ठेवून वाकलेला किंवा कधी खाली बसलेला दिसतो. त्यामुळे झेलची संधी जास्त असते. त्यामुळे रोहितने फिरकी गोलंदाज गोलंगदाजी करत असताना जैस्वालला फलंदाजाच्या अगदी जवळ क्षेत्ररक्षणासाठी उभे केले होते.मेलबर्नमधील बॉक्सिंग डे कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाने पहिल्या डावात सहा गडी गमावून ३११ धावा केल्या. स्टीव्ह स्मिथ ६८ धावांवर नाबाद असून कर्णधार पॅट कमिन्स आठ धावांवर नाबाद आहे. १९ वर्षीय नवोदित सॅम कॉन्स्टासने उस्मान ख्वाजासोबत पहिल्या विकेटसाठी ८९ धावांची भागीदारी केल्याने कांगारूंची चांगली सुरुवात झाली. सॅम कॉन्स्टासने पदार्पणाच्या सामन्यात आक्रमक फलंदाजी करत बुमराहला लक्ष्य केले. त्याने अर्धशतक झळकावले. मात्र, यानंतर तो रवींद्र जडेजाच्या चेंडूवर एलबीडब्ल्यू आऊट झाला. तो ६५ चेंडूंत सहा चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ६० धावा करून बाद झाला.यानंतर ख्वाजाने स्टीव्ह स्मिथसोबत दुसऱ्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी केली. ख्वाजाने आपल्या कसोटी कारकिर्दीतील २७ वे अर्धशतक झळकावले. १२१ चेंडूत सहा चौकारांच्या मदतीने ५७ धावा करून तो बुमराहच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याच वेळी, हेड खाते उघडू शकला नाही. त्याला बुमराहने क्लीन बोल्ड केले. त्यानंतर बुमराहने मिचेल मार्शला स्वस्तात बाद केले. त्याला चार धावा करता आल्या. लबूशेनने १४५ चेंडूंत सात चौकारांच्या मदतीने ७२ धावांची खेळी केली. त्याचे कसोटी कारकिर्दीतील हे २२ वे अर्धशतक होते. त्याचबरोबर स्मिथने आतापर्यंत शानदार फलंदाजी केली आहे. त्याने १११ चेंडूत ६८ धावांच्या नाबाद खेळीत पाच चौकार आणि एक षटकार ठोकला. भारताकडून बुमराहने तीन विकेट्स घेतल्या. तर आकाश दीप, जडेजा आणि सुंदर यांना प्रत्येकी एक विकेट घेतली. वास्तविक, जेव्हा स्टीव्ह स्मिथ आणि मार्नस लबूशेन फलंदाजी करत होते, तेव्हा रोहितने जैस्वालला फलंदाजाच्या अगदी जवळ क्षेत्ररक्षण करण्यासाठी उभे केले होते. यावेळी जैस्वाल हा चेंडू त्याच्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच हवेत उडी मारताना दिसल्याने रोहित शर्मा संतापला.

### कॉन्स्टासने बुमराहला लक्ष्य केले

" रोहितचा हा आवाज स्टंप माईकमध्ये कैद झाला."खरं तर, अनेक वेळा फलंदाजाच्या जवळचा क्षेत्ररक्षक क्षेत्ररक्षण करताना गुडघ्यावर हात ठेवून वाकलेला किंवा कधी खाली बसलेला दिसतो. त्यामुळे झेलची संधी जास्त असते. त्यामुळे रोहितने फिरकी गोलंदाज गोलंगदाजी करत असताना जैस्वालला फलंदाजाच्या अगदी जवळ क्षेत्ररक्षणासाठी उभे केले होते.मेलबर्नमधील बॉक्सिंग डे कसोटीच्या पहिल्या दिवसाचा खेळ संपला आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाने पहिल्या डावात सहा गडी गमावून ३११ धावा केल्या. स्टीव्ह स्मिथ ६८ धावांवर नाबाद असून कर्णधार पॅट कमिन्स आठ धावांवर नाबाद आहे. १९ वर्षीय नवोदित सॅम कॉन्स्टासने उस्मान ख्वाजासोबत पहिल्या विकेटसाठी ८९ धावांची भागीदारी केल्याने कांगारूंची चांगली सुरुवात झाली. सॅम कॉन्स्टासने पदार्पणाच्या सामन्यात आक्रमक फलंदाजी करत बुमराहला लक्ष्य केले. त्याने अर्धशतक झळकावले.

# बॉक्सिंग डे कसोटीत खलिस्तान्यांचा राडा

## खलिस्तान समर्थक तिकिटाविना मैदानात घुसले; भारत विरोधी घोषणा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघ ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळण्यासाठी सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिकेतील चौथ्या सामन्याला (बॉक्सिंग डे कसोटी) आजपासून मेलबर्नच्या, मेलबर्न क्रिकेट मैदानावर सुरुवात झाली आहे. अशात या सामन्याच्या दरम्यान काही खलिस्तान समर्थक तिकिटाविना मैदानात घुसले आणि भारत विरोधी घोषणा देत झेंडे फडकवू लागले. यानंतर व्हिक्टोरिया पोलिसांनी त्यांना हटवले.**




यावेळी भारतीय चाहत्यांनी तिरंगा उंचावत भारताच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. सध्या या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.मेलबर्न क्रिकेट मैदानावर खलिस्तान समर्थक आणि भारतीय चाहत्यांमध्ये झालेल्या शाब्दिक वादावर एएनआयशी बोलताना एक चाहता म्हणाला, "मला त्यांना कोणतीही प्रसिद्धी देण्याची गरज वाटत नाही. ते काहीही करतात. ते कधीही पंजाबला आलेले नाहीत आणि हा मूर्खपणाचा अजेंडा राबवत आहेत."एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, मेलबर्नमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात बॉक्सिंग डे कसोटी सामना सुरू असताना, खलिस्तान समर्थक खलिस्तानचा झेंडा घेऊन एमसीजीमध्ये घुसले. त्यानंतर या खलिस्तान समर्थकांना भारतीय चाहत्यांच्या रोषाचा सामना करावा लागला.यावेळी भारतीय क्रिकेट चाहत्यांनी या खलिस्तान समर्थकांना भारताचा तिरंगा झेंडा फडकावत आणि घोषणाबाजी करत प्रत्युत्तर दिले.

### पहिल्या दिवसाचा 83 षटकांचा खेळ

दरम्यान, ही घटना घडल्याची माहिती मिळताच मेलबर्न पोलिसही घटनास्थळी तातडीने दाखल झाले. परिस्थिती चिघळू नये म्हणून पोलिसांनी मध्यस्थी करून प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला. भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिकेतील चौथ्या सामन्याला आज सुरुवात झाली आहे. यामध्ये शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा पहिल्या दिवसाचा ८३ षटकांचा खेळ पूर्ण झाला असून, यामध्ये ऑस्ट्रेनियाने ६ फलंदाज गमावून ३०० धावा केल्या आहेत. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने विजय मिळवला होता.